**शपथेवर सरतपास श्री. देशपांडे अधिवक्ता गैरअर्जदारातर्फे :–**

३. शपथपत्र **नि.क्र. सि.–०६** मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझे सांगितल्याप्रमाणे लिहिलेला आहे. तो खरा व बरोबर आहे. दस्त यादी सि.५ सोबत अनु.क्रं. १. वरील बडतर्फ आदेश, २. वरील आरोपपत्र, ३. वरील बसस्थानक प्रमुख यांनी आगार व्यवस्थापक यांना दिलेले पत्र ४. वरील अनुशासनात्मक कार्यवाही बाबत कारण मिमांसा पत्र अनु.५ वरील निष्कर्ष ६. वरील समक्ष चौकशी ७. वरील चौकशी अधिकारी यांनी पाठविलेली नोटीसचे विभाग नियंत्रक यांनी प्रमाणित प्रती सादर केलेल्या आहे. सदर छायांकित प्रती हया रेकॉर्ड प्रमाणे असल्याबाबत तक्रार दाराचे दुमत नाही त्यामुळे त्यास अनु.क्रं. **नि. सि. ७ ते सि. १३** देण्यात आले.

४. दस्त यादी सि.५ सोबत अनु.८ वरील ट्ॅककन्सेनमेंट रिपोर्टची प्रत मला दाखविली. सदर ट्ॅककन्सेटमेंट रिपोर्टला **नि.सि.१४** देण्यात आले. सि.५ सोबत अनु. ९ वरील समक्ष प्राधिकारी यांनी घेतलेली समक्ष चौकशीचे कागदपत्र विभाग नियंत्रक यांनी प्रमाणीत केलेली प्रत सादर केलेली आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. सि. १५** देण्यात आले.

**उलटतपास श्री.वानखेडे विधिज्ञ अर्जदारातर्फे:–**

५. हे म्हणने खरे आहे नाही, रा. प. महामंडळामध्ये कोणताही कर्मचारी सुरूवातील लागल्यानंतर तो रोजंदारी गट क्रं.१ वर लागतो. हे म्हणणे खरे आहे की सदर कर्मचारी यांना सकाळी ५.०० वाजता हजर होउन रिपोर्ट करावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, सदर कर्मचा–याचे कर्तव्याचे शेडयुल निश्चित नसते. हे म्हणणे खरे आहे की, नियमीत कर्मचारी सुटीवर गेल्यास त्यांचे जागी रोजंदारी तत्वावर लागलेल्या कर्मचा–याला पाठविले जाते

व शेडयुल पुर्ण केले जाते. हे म्हणणे खरे आहे की, दि. ५/९/२०२१ ते १६/०३/२०२३ या कालावधीमध्ये कुठले शेडयुल रद्द करण्यात आले होते याबाबत मी कोणतेही कागदपत्र सादर केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारकर्ता हा वरील कालावधीत हजर न झाल्यामुळे कोणते शेडयुल रद्द झाले होते याबाबत मी कोणतेही कागदपत्र सादर केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, रा.प.महामंडळाचे ७१८५० कि.मी.चे उत्पन्न बुडाले हे दर्शविण्यासाठी कोणताही कागदोपत्र पुरावा सादर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, रा.प.महामंडळाचे रक्कम रू.१७,९६,०००/– चे नुकसान झाले हे दर्शविण्यासाठी कोणतेही कागदपत्र सादर केले नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की, दि.०५/०९/२०२१ ते १६/०३/२०२३ या कालावधीत तक्रारकर्ता हा आजारी असल्यामुळे तो कर्तव्यावर येउ शकला नाही. हे म्हणणे खरे नाही की,तक्रार कर्त्याने तो गैरहजर असल्याबाबत वेळोवेळी अर्ज व वैद्यकिय प्रमाणपत्र दिलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी प्राथमीक चौकशी करीत असतांना तक्रार कर्त्याने वैद्यकिय कागदपत्र सादर केले होते परंतु ते मी विचारात घेतले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तक्रारकर्ता गैरहजर असल्याबाबत आगार व्यवस्थापक चंद्रपुर यांना सादर केला. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले असुन आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण माझे समक्ष

फेरतपास काही नाही. श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/–
(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर.

दि. १९.१२.२०२५.